# क्षयरोग विभागातील केमिकल व औषधाचे ते टेंडर संशयाच्या विळख्यात

## संबंधित जबाबदार अधिकाऱ्याची मनमानी, त्या टेंडरवर डीएचओ यांची स्वाक्षरी नसल्याची मिळाली माहिती

**बीड । दिव्य रिपोर्टर**

क्षयरोग विभागात रुग्णांसाठी लागणारे केमिकल व औषध खरेदीचे टेंडर नुकतेच ओपन करण्यात आले. संबंधित विभागाला दहा लाख रुपयांचा निधी असताना संबंधित विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी चक्क ३९ लाख रुपयांचे टेंडर काढले असल्याने सदरील टेंडर संशयाच्या विळख्यात असून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची मनमानी सुरू असल्याचे यातून दिसून येत आहे. तसेच त्या टेंडरवर वरिष्ठ अधिकारी डीएचओ यांची स्वाक्षरी नसल्याची माहिती मिळाली असून सदरील टेंडर प्रकरण संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांच्या अंगलट येण्याची शक्यता दर्शवली जात आहे. याप्रकरणी ज्येष्ठ समाजसेवक प्रशांत चौरे यांनी तक्रार दिल्यानंतर या प्रकरणाची चौकशी

**केमिकल व औषध खरेदीसाठी क्षयरोग विभागाला फक्त दहा लाख रुपयांचा निधी परंतु जबाबदार अधिकारी यांनी चक्क ३९ लाख रुपयांचे टेंडर काढले कसे? प्रकरण अंगलट येण्याची शक्यता**

**ज्येष्ठ समाजसेवक प्रशांत चौरे यांच्या तक्रार प्रकरणी चौकशी समिती गठीत, दोन वर्षांपूर्वी झालेल्या टेंडरचीही चौकशी होणार**

**३९ लाखाच्या टेंडरमध्ये केमिकल व औषधाच्या दरात मोठा घोळ झाल्याचा संशय, टेंडरमध्ये सहभाग घेणाऱ्याने बनावट कागदपत्रे जोडल्याची शंका**

करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली असून दोन वर्षांपूर्वी क्षयरोग विभागातून काढलेल्या टेंडरचीही चौकशी होणार असल्याचे दिसून येत आहे.

दहा लाखाचा निधी असताना ३९ लाख रुपयांचे टेंडर काढल्याने क्षयरोग विभागातील हे टेंडर चर्चेत असून अनेक नियमाची पायमल्ली करून सदरील टेंडर काढल्याचे दिसून येत असून याप्रकरणी आता सीईओ जितिन रहेमान यांनी विशेष लक्ष देण्याची गरज भासत आहे. याप्रकरणी ज्येष्ठ समाजसेवक प्रशांत चौरे यांच्या तक्रारीची दखल घेत दिव्य आधारने या प्रकरणाला वाचा फोडल्यानंतर प्रशासकीय लक्ष याकडे केंद्रित झाले असून या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती गठित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे दोन वर्षांपूर्वीही क्षयरोग विभागातून अशाप्रकारे टेंडर काढण्यात आले होते. त्या टेंडरचीही यावेळी चौकशी होणार असल्याचे समजले असून चौकशीअंती सदरील प्रकरण जबाबदार अधिकाऱ्याच्या अंगलट येण्याची शक्यता दर्शवली जात आहे. तसेच दहा लाखाचा निधी असताना ३९ लाख रुपयांचे टेंडर काढले कसे? हा खऱ्या अर्थाने चौकशीचा भाग असून मिळालेल्या माहितीनुसार क्षयरोग विभागातील अधिकाऱ्यांनी ३९ लाख रुपयांचे वर्षभराचे टेंडर एकत्रित काढल्याची माहिती त्यांनी दिली असून निधी नसताना वर्षभराचे टेंडर काढणे कितपत योग्य आहे, अशा अनेक बाबी संशयास्पद असून चौकशीअंती या सर्व प्रकरणात कारवाई होणार असल्याचेही समजले आहे.

### दरातही मोठा घोळ? बनावट कागदपत्रांचा वापर झाल्याचा संशय

क्षयरोग विभागातून काढण्यात आलेल्या या टेंडरमध्ये केमिकल व औषधांची दर नमूद आहेत त्या दरामध्ये मोठी तफावत दिसून येत असून हे टेंडर मिळविण्यासाठी बनावट कागदपत्रांचाही वापर झाल्याची शंका निर्माण झाली आहे. तसेच आयएसओ नामांकन पत्रासंदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या टेंडर प्रक्रियेत सहभाग घेतलेल्या सर्व संचिका तपासण्याची गरज आहे. तसेच दरात झालेला घोळ याबाबतही शंका असून प्रशासनाने मागील वर्षी केमिकल व औषधाचे दर काय होते? आणि यंदा काय दर आहेत? यात तफावत आहे का? याचाही शोध घेण्याची गरज आहे. तसेच यंदा टेंडरसाठी जाचक अटी असल्याने अनेक पात्र कंत्राटदार या टेंडरपासून वंचित राहिल्याचे दिसून येत असून सीईओ जितिन रहेमान यांनी या सर्व प्रकरणाचा पारदर्शक पाठपुरावा करणे गरजेचे वाटते.


सत्यमेव जयते

DIVYA AADHAR

https://epaper.divyaaadhar.com

साप्ताहिक दिव्य आधार

rizwanshaikhekmat33@gmail.com

संपादक : शेख रिजवान मो. 9561840184

बीड वर्ष १३ वे, अंक ३०, सोमवार, दि. २३ मार्च २०२६ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया





ग्राऊंड रिपोर्टींग पान ३ वर


# त्या गायरान जमीन प्रकरणी २०२४ साली झालेल्या रजिस्ट्री संदर्भात सहनिबंधक यांच्याकडे तक्रार दाखल करणार



**गायरान जमिनीवर म्हाडाचे आरक्षण असताना सदरील जमीन बीड शहर हद्दीत असताना त्या जमिनीची रजिस्ट्री झाली कशी? संबंधित सहनिबंधक यांच्यावर कारवाईची मागणी**

**मनसेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे याप्रकरणी पाठपुरावा करणार असल्याची त्यांनी दिली माहिती**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

तरफ पिंगळे येथील गायरान जमीन १९८५ साली रजिस्ट्री करून विक्री करण्यात आली. सदरील जमीन गायरान असल्याने ती गायरान जमीन रजिस्ट्री करून विक्री करायची असेल तर जिल्हाधिकारी किंवा भूसुधार उपजिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. परंतु संबंधितांनी प्रशासनाची कोणतीही परवानगी न घेता सदरील गायरान जमीन त्या काळात रजिस्ट्री करून विक्री केल्याचे दिसून येत असल्याने याप्रकरणी संबंधित गायरान जमिनीचे लाभार्थी मालक यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. तसेच १९८५ साली ज्या व्यक्तीने ही जमीन खरेदी केली होती त्या व्यक्तीने सदरील जमीन २०२४ या वर्षी थर्ड पार्टीला पुन्हा रजिस्ट्री करून विक्री केली. विशेष म्हणजे ज्यावेळी २०२४ या वर्षी या जमिनीची रजिस्ट्री झाली त्यावेळी या जमिनीवर म्हाडाचे आरक्षण होते. तसेच २०२४ च्या खरेदीखतामध्ये सदरील जमीन शहर हद्दीच्या बाहेर आहे असा उल्लेख करण्यात आलेला आहे. जर सदरील जमीन शहर हद्दीच्या बाहेर होती तर त्या जमिनीवर आरक्षण कसे पडले होते? यात अनेक बाबी संशयास्पद असून या प्रकरणी आता मनसेचे राज्य उपाध्यक्ष हे सहनिबंधक यांच्याकडे तक्रार करून अशाप्रकारे कोणतीही शहनिशा न करता रजिस्ट्री करून देणाऱ्या निबंधकावर कारवाईची मागणी करणार असल्याचेही अशोक तावरे यांनी दिव्य आधारला सांगितले.

तरफ पिंगळे येथील १९८५ साली रजिस्ट्री झालेल्या जमिनीवर म्हाडाचे आरक्षण होते. सदरील म्हाडाचे आरक्षण काढण्यासाठी ऑगस्ट २०२४ या महिन्यात राज्यपाल यांच्या शिफारशीने प्रस्ताव सादर करण्यात आला होता. नियमाने सदरील म्हाडाचे आरक्षण मार्च २०२५ यावर्षी काढण्यात आले. परंतु दरम्यान संबंधिताने ऑक्टोबर २०२४ या वर्षी सदरील जमीन रजिस्ट्री करून थर्ड पार्टीला विक्री केली. नियमाने ज्यावेळी ऑक्टोबर २०२४ रोजी जमिनीची रजिस्ट्री झाली त्यावेळी मात्र या जमिनीवर म्हाडाचे आरक्षण असल्याचे दिसून येते. तसेच संबंधितांनी निबंधक यांची दिशाभूल करून सदरील


पान २ वर


### अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज

२०२४ यावर्षी ज्यावेळी त्या जमिनीची रजिस्ट्री झाली त्यावेळी नगरपालिकेतील नकाशावर तरफ पिंगळे या जमिनीवर म्हाडाचे आरक्षण असल्याचे स्पष्ट दिसून येते. तसेच सदरील जमीन शहर हद्दीत आहे यातून स्पष्ट होते. परंतु रजिस्ट्री कार्यालयातील काही अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष करून सदरील जमिनीचे खरेदीखत करून दिले. ही अत्यंत गंभीर बाब असून या प्रकरणी महसूलमंत्री यांच्यासह मुख्यमंत्री यांच्याकडेही या प्रकरणाची तक्रार करणार असल्याची माहिती मनसेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे यांनी केली असून आता बोगसगिरीला चपराक बसणार यात काही शंका नाही.

# ७३ कोटीच्या दंडात्मक कारवाई प्रकरणात त्या मालकाच्या मालमत्तेची खरेदी-विक्री पुन्हा थांबविली

## तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे सहनिबंधक अधिकाऱ्यांना पत्र, एसडीएम जाधव मॅडम यांनाही कळविले

**बीड । दिव्य रिपोर्टर**

नियमाने खदाणीची परवानगी घेवून त्या खदाणीतून क्षमतेपेक्षा जास्त अवैधरित्या गौणखनिज उत्खनन केलेली बाब बीड तहसीलदारांचा निदर्शणास आल्यानंतर तहसीलदार यांनी संबंधित खदाणमालकावर ७३ कोटीची दंडात्मक कारवाई केली. जोपर्यंत दंड भरला जाणार नाही तोपर्यंत संबंधित खदाणमालकाच्या सातबारावर बोजा चढविण्यात आला व बीड रजिस्ट्री कार्यालयात पत्र देवून संबंधित मालकाच्या व त्यांच्या कुटुंबीयातील व्यक्तीच्या मालमत्तेची खरेदी-विक्री थांबविण्यात आली. परंतु संबंधित मालकाने आपल्यावर अन्याय झाल्याची भूमिका घेत प्रशासनाला पत्रव्यवहार केल्यानंतर रजिस्ट्री



कार्यालयातील संबंधित मालकाच्या खरेदी-विक्री थांबविण्यात आलेली अट शिथिल करण्यात आली परंतु दिव्य आधारने याप्रकरणी पाठपुरावा केल्यानंतर बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पुन्हा या प्रकरणी सहनिबंधक अधिकारी यांना पत्रव्यवहार करून संबंधित मालकाच्या प्रॉपर्टीची खरेदी-विक्री थांबविली असून याप्रकरणी तहसीलदार यांनी एसडीएम जाधव मॅडम यांनाही कळविले आहे.

शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या चऱ्हाटा शिवारात एका व्यक्तीने खदाण सुरू करण्यासाठी नियमाने प्रशासनाकडून परवानगी घेतली होती परंतु त्या खदाणीतून क्षमतेपेक्षा जास्त गौणखनिज उत्खनन झाल्याची बाब प्रशासनाच्या निदर्शणास आल्यानंतर बीड तहसीदार यांनी चऱ्हाटा येथील त्या खदाण मालकावर ७३ कोटी रुपयांची दंडात्मक कारवाई केली


पान २ वर


### ईटीएस मोजणी झाली तर मोठी पोलखोल होणार

ज्यावेळी बीड तहसीलदार यांनी चऱ्हाटा येथील त्या खदाणीची पाहणी केली त्यावेळी त्या खदाणीतून क्षमतेपेक्षा जास्त अवैध गौणखनिज उत्खनन झाल्याचे निदर्शणास आले. त्यावेळी तहसीलदार यांनी संबंधित खदाण मालकावर ७३ कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. तसेच सदरील खदाणीची ईटीएस मोजणीसाठी भूमिअभिलेख कार्यालयाला पत्रव्यवहारही केला होता परंतु आतापर्यंत त्या खदाणीची ईटीएस मोजणी का झाली नाही? याचा पाठपुरावा करण्याची गरज असून तहसीलदार शेळके यांनी याप्रकरणी आता विशेष लक्ष घातले असले तरी दंडात्मक कारवाईची वसूली करावी अशी सर्वसामान्यातून मागणी होत आहे.

# तरफ पिंगळे येथील त्या अंध-वृद्ध लाभार्थ्याच्या गायरान जमिनीतून अवैध उत्खनन प्रकरणी त्या भाडेकरूला आपले मत मांडण्यासाठी पुन्हा एक संधी

**बीड । दिव्य रिपोर्टर**

दोन्ही डोळ्याने अंध असल्याने तसेच मुलं-बाळं नसल्याने मिळालेल्या गायरान जमिनीचे सिंचन करायचे कसे? या विवंचनेत एका अंध-वृद्ध शेतकऱ्याने आपल्या लाभाची गायरान जमीन भाडेतत्वावर एका भाडेकरूला दिली. परंतु संबंधित भाडेकरूने जमीन सिंचन करण्याऐवजी त्या जमिनीतून आडमाप गौणखनिज उत्खनन करून अवैध मार्गाने विक्री केले. संबंधित लाभार्थी अंध असल्याने आपल्या शेतातून अवैध उत्खनन होत असल्याचे त्यांना उशिरा समजले. त्यानंतर काही समाजसेवकांच्या माध्यमातून संबंधित लाभार्थी वृद्धाने बीड

**शेवटची संधी हुकली तर त्या भाडेकरूच्या मालमत्तेवर बोजा चढविणार असल्याची माहिती तहसीलदार शेळके यांनी दिली**

**अंध-वृद्ध लाभार्थ्याला गायरान जमिनीचा ताबा देण्यासाठी अद्याप कोणतेच पत्र देण्यात आले नाही**

जिल्हाधिकारी यांच्याकडे या अवैध उत्खननाची तक्रार केली. याची दखल बीड तहसीलदार यांनी घेत त्यांच्या दालनात या प्रकरणी सुनावणी ठेवण्यात आली परंतु दोन्ही सुनावणीच्या वेळी संबंधित भाडेकरू गैरहजर राहिला. शेवटी बीड तहसीलदार यांनी संबंधित भाडेकरूला आपले मत मांडण्यासाठी एक शेवटची संधी दिली असून जर ही संधी हुकली तर संबंधित भाडेकरूच्या मालमत्तेवर बोजा चढविला जाईल अशी माहिती तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिव्य आधारला दिली.



संबंधित अंध-वृद्ध गायरान जमीन लाभार्थी मालकाची जमीन भाडेतत्वावर घेवून त्या जमिनीतून अवैध गौणखनिज उत्खनन केल्यानंतर त्या जमिनीला अक्षरश: खदाणीचे स्वरूप आले आहे. याप्रकरणी


पान २ वर


### ताबा देण्यासाठी अद्याप कोणतेच पत्र नाही लाभार्थी अंध-वृद्धाचे तहसील कार्यालयात हेलपाटे

बीड तहसीलदार यांनी संबंधित गायरान जमीन लाभार्थी यांनी आपल्या हक्काची जमीन ताब्यात घ्यावी म्हणून आदेशित केले आहे. परंतु शेतजमिनीच्या जागेवर खदाण झाल्याने ती खदाणस्वरूप जमीन ताब्यात घेवून ते अंध-वृद्ध काय करणार? हा महत्त्वाच प्रश्न उपस्थित झाला असून सर्वप्रथम संबंधित लाभार्थी यांनी स्वत:ची जमीन ताब्यात घ्यावी, त्यानंतर तालुका प्रशासन संबंधित दोषीवर पुढील कारवाई करणारच आहे अशी प्रतिक्रिया बीड तहसीलदार यांनी व्यक्त केली असून यासाठी बीड तहसीलदार संबंधित गायरान लाभार्थ्याला जमीन ताब्यात मिळावी म्हणून बीड ग्रामीण पोलीस निरीक्षक यांच्या नावाने पत्र देणार होते परंतु अद्याप कोणतेही पत्र संबंधित अंध-वृद्धाला मिळाले नसून पत्र मिळविण्यासाठी संबंधिताचे तहसील कार्यालयात हेलपाटे सुरू आहेत.

# घरकुलांसह वैयक्तिक लाभाच्या योजनांची लाभार्थी संख्या आणि विकास कामे दुपटीने करण्यासाठी प्रयत्नशील - धनंजय मुंडे

**परळी । दिव्य रिपोर्टर**

परळी वैद्यनाथ शहर विकासाच्या वाटेवर असून मागील काही दिवसांत मी अत्यंत कठीण परिस्थितीत असताना परळीतील नागरिकांनी महायुतीच्या पाठीशी भक्कम ताकद उभी करत नगर परिषद आमच्या ताब्यात दिली. त्यामुळे विविध योजनेतील घरकुले, अन्य वैयक्तिक लाभाच्या योजनामधील लाभार्थी संख्या आणि सार्वजनिक हिताच्या विकासकामांचा वेग आता दुप्पट करण्यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांच्या मदतीने अधिक व्यापक काम करणार असल्याचे मत माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी येथे बोलताना व्यक्त केले.





परळी वैद्यनाथ नगर परिषदेच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत मंजूर ६७७ घरकुल लाभार्थींना पहिल्या हप्त्याची प्रत्येकी एक लाख रुपये रक्कमेचे धनादेश आज धनंजय मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर येथे आयोजित कार्यक्रमात वितरीत करण्यात आले.

यावेळी नगर परिषद अंतर्गत रमाई आवास योजनेतून आणखी २०० घरकुले मंजूर करण्यात आली असून त्याचे प्रस्ताव व अन्य बाबी तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकारी व नगरसेवकांना दिल्या.

या कार्यक्रमा प्रसंगी ५६५ दिव्यांग बांधवांना नगर परिषदेच्या ५% राखीव निधीतून आर्थिक मदतीचेही


पान २ वर


# पोलीस दलाकडून सीसीटीव्ही मोबाईल कंट्रोल व्हॅनचा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रभावी वापर

**बीड । दिव्य रिपोर्टर**

मा.पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी बीड यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हा पोलीस दलासाठी एक अत्याधुनीक सी.सी.टी.व्ही. मोबाईल व्हॅन तयार करण्यात आली असून त्यामध्ये -ख प्रणालीचा वापर करण्यात आला आहे. सदर मोबाईल कंट्रोल रूम व्हॅन मध्ये एकूण २५ सीसीटीव्ही कॅमेरे असून ते एआय बेस आहेत ज्यामध्ये ०१ पी टी झेड कॅमेरा, ०६ कॅमेरे हे फेस रिकग्नेशन आहेत जे की प्रत्येक व्यक्तीचा फोटो वेगळा काढून जतन करतात व ०४ कॅमेरे हे ए एन पी आर कॅमेरे असून ते वाहनांचे नंबर प्लेटचा फोटो काढून जतन करतात तसेच व्हॅनसाठी स्वतंत्र लाईटची व्यवस्था असून ज्याचा बॅकअप सहा तासांपर्यंत मिळतो. महत्त्वाच म्हणजे सर्व सीसीटीव्ही कॅमेरा हे कोणत्याही केबल शिवाय २० ज्ञा पर्यंत व्हॅनमध्ये लाईव्ह बघता येतात. अशा प्रकारची अत्याधुनीक उपकरणांनी सज्ज असलेली सी.सी.टी.व्ही. मोबाईल व्हॅन बीड जिल्हा पोलीस दलात कार्यरत करण्यात आली आहे.





सदर मोबाईल व्हॅनचा प्रथम वापर दिनांक २०.०३.२०२६ रोजी मौजे पाचेगाव येथील कानीफनाथ महाराज यात्रेत करण्यात आला. सदर गावात मागील वर्षी कानीफनाथ महाराज यात्रेत दोन समाजामध्ये जातीय तेढ निर्माण झाली होती. त्या अनुषंगाने मा.नवीनत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, मा. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक, बीड, मा. अनिल कटके, उप विभागीय पोलीस अधीकारी, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली किशोर पवार, पोलीस निरीक्षक, गेवराई यांनी योग्य नियोजन करून पाचेगाव येथे अतिरिक्त बंदोबस्त व मा. पोलीस अधीक्षक साहेबांच्या संकल्पनेतून साकरण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. मोबाईल व्हॅनचा कुशलतेने वापर करून सदर व्हॅनचे ऑपरेटर पोह/१२७५ अमोल ससाणे यांनी अत्याधुनीक सी.सी.टी.व्ही. व्हॅन चे कामकाज पाहिले. पोलीस ठाणे गेवराई येथील सर्व दुय्यम अधिकारी व अंमलदार यांनी तीन दिवस सातत्याने बंदोबस्त करून यात्रा बंदोबस्तात करून शांततामय वातावरणात यांत्रा पार पाडली.

# अनाधिकृत भागशाळा व त्या उर्दू शिक्षणसंस्थेच्या शिक्षक भरतीप्रकरणी एसआयटीकडे लेखी तक्रार दाखल होणार

## अनाधिकृत भागशाळा प्रकरण त्या शिक्षणसंस्थेच्या अंगलट येण्याची शक्यता

**बीड । दिव्य रिपोर्टर**

तुकडी वर्गाची मान्यता घेवून त्या मान्यतेच्या आधारावर शहरात एक-दोन नव्हे तर चक्क तीन-तीन अनाधिकृत भागशाळा सुरू करून या अनाधिकृत भागशाळेच्या नावावर शिक्षकभरती केल्याची बाब एका उर्दू शिक्षणसंस्थेच्या शाळेत झाल्याचे दिसून येत असून याप्रकरणी शिक्षणविभागाने वेळेतच दखल घेणे गरजेचे होते परंतु शिक्षणविभागाने या गंभीर प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्याने आता अनाधिकृत भागशाळा व त्या उर्दू शिक्षणसंस्थेत शिक्षक भरतीप्रकरणी चक्क एसआयटीकडे

**जर एसआयटीने पारदर्शक चौकशी केली तर त्या उर्दू शिक्षणसंस्थेची मोठी पोलखोल होणार**

लेखी तक्रार देणार असल्याची माहिती एका समाजसेवकाने दिली असून लवकरच याप्रकरणी लेखी तक्रार दाखल होणार असल्याचे दिसून येते.

१९७४ साली शाळेची कमतरता असल्याने तसेच विद्यार्थ्यांच्या वाहातुकीचा प्रश्न समोर असल्याने तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी त्यावेळी काही उर्दू


पान २ वर


### एसआयटी पथकाने पारदर्शक चौकशी केली तर मोठी पोलखोल होणार

तुकडीवर्गाच्या नावावर मागील अनेक वर्षांपासून त्या उर्दू शिक्षणसंस्थेच्या अनाधिकृत भागशाळा शहरात सर्रास सुरू आहेत. त्या अनाधिकृत भागशाळांचा फटका जिल्हा परिषदच्या शाळांना बसत असतानाही शिक्षणविभाग याकडे का दुर्लक्ष करते? हे मात्र समजून येत नाही. परंतु आता या प्रकरणाची तक्रार एसआयटीकडे होणार असून जर एसआयटीने या प्रकरणाची पारदर्शक चौकशी केली तर त्या उर्दू शिक्षणसंस्थेत झालेल्या शिक्षकभरतीची मोठी पोलखोल होणार असल्याचेही बोलले जात आहे. त्यासाठी शिक्षणविभागाने वेळेच्या आता कारवाई करून या अनाधिकृत भागशाळांना कुलूप ठोकावे अशी सर्वसामान्यातून मागणी होत आहे.

# जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात साजरी



**बीड । दिव्य रिपोर्टर**

हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण संबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून आज पवित्र रमजान ईद उत्सवाच्या निमित्ताने सर्व मुस्लिम बांधवांना मनःपूर्वक ईद मुबारकच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. रमजानचा पवित्र महिना संयम, त्याग, बंधुभाव आणि मानवतेचे महत्त्व शिकवतो. या सणाच्या माध्यमातून समाजात एकता, शांतता आणि सौहार्द अधिक दृढ व्हावे, हीच अपेक्षा व्यक्त केली. सर्व धर्म आणि जातींच्या नागरिकांमधे बंधुभाव आणि एकोप्याची भावना कायम राहावी, यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे कार्य करत राहूया, असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला. सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि शांती नांदो, हीच सदिच्छा. यावेळी आ.विजयसिंह पंडित, माजी आ.सय्यद सलीम, भाजपचे डॉ.योगेशभैय्या क्षीरसागर, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्यासह उपस्थित मान्यवर.









## ईद निमित्त मीडियातील गरजवंताना 'ईद मुबारक किट' वाटप

### राजयोग फाउंडेशन व पत्रकार संघाचा स्तुत्य उपक्रम

**बीड । दिव्य रिपोर्टर**

रमजान ईदच्या पवित्र सणानिमित्त समाजात बंधुभाव, सहकार्य आणि मानवतेचा संदेश देत राजयोग फाउंडेशन आणि पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि सोशल मीडियामध्ये कार्यरत असलेल्या गरजवंत पत्रकार बांधवांना 'ईद मुबारक किट' चे वाटप करण्यात आले.या उपक्रमातून समाजात एकात्मता आणि परस्पर सहकार्याची भावना दृढ करण्याचा संदेश देण्यात आला.

बीड येथील समर्थ राजयोग च्या मुख्य कार्यालयामध्ये राजयोग फाउंडेशन आणि पत्रकार संघाच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दिनांक १८ मार्च २०२६ रोजी दुपारी दोन वाजता ईद मुबारक कीटचे वाटप करण्यात आले. यावेळी राजयोग फाउंडेशनचे अध्यक्ष तथा नगरसेवक शुभम धूत,



पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी,नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्धिकी, डॉ.वैभव कोठेकर, राजदिप धुत, सागर वाहुळ, मेघराज जगदाळे, सुशांत राऊत, संकेत करवा, वैभव घुमरे, सय्यद ताहेर, राहुल बादाडे, अभिजीत आव्हाड, ओंकार बोबडे राजयोग फाऊंडेशनचे इतर सदस्य यांच्यासह ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते सुदाम चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, नयना भाकरे, जिल्हा उपाध्यक्ष रईस खान, शेख आयुब, संपादक समीर काजी, लोकमतचे शेख वाजेद, रफिक पठाण, शेख तालेब यासह मान्यवर पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार हे समाजाचे चौथे स्तंभ मानले जातात. अनेक वेळा ते कठीण परिस्थितीत काम करत असतात. अशा पत्रकार बांधवांच्या पाठीशी उभे राहण्याचा आणि त्यांच्या सणाला आनंदाची उधळण करण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे आयोजक राजयोग फाउंडेशनचे अध्यक्ष नगरसेवक शुभम दिलीप धूत यांनी याप्रसंगी सांगितले. कार्यक्रमा दरम्यान पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी ईदच्या सणाचे महत्त्व सांगत समाजात शांतता, सद्भावना आणि बंधुत्व टिकवण्याचे आवाहन केले. तसेच समाजातील गरजूंना मदतीचा हात देणे हीच खरी सामाजिक सेवा असल्याचेही त्यांनी नमूद केले. या उपक्रमामुळे पत्रकार बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी आयोजकांच्या या सामाजिक बांधिलकीच्या कार्याचे कौतुक केले. भविष्यातही अशाच प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला. ईदच्या पवित्र सणाच्या पार्श्वभूमीवर राबविण्यात आलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला असून सामाजिक एकोपा आणि मानवतेचा संदेश देणारा आदर्श उपक्रम म्हणून याची सर्वत्र प्रशंसा होत आहे.



बीड : नवनिर्वाचित नगरसेवक महेश धांडे यांनी येथील ज्येष्ठ समाजसेवक मुसा खान पठाण यांच्या घरी ईदनिमित्त सदिच्छा भेट देवून मुसा खान व मित्रपरिवारांना शुभेच्छा दिल्या. त्यावेळी मुसा खान यांनी नगरसेवक महेश धांडे व पप्पू आगे यांचा सत्कार केला. त्यावेळी अरबाज खान, इम्राण खान, अबरार खान, अजमत खान, शेख आमेर, जिशान बेग आदींची उपस्थिती होती.

## आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण



बीड । दिव्य रिपोर्टर

समायरा नासेर शेख हिने वयाच्या सातव्या वर्षी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. यानिमित्ताने सर्व मित्रपरिवारांनी समायरा हिचे कौतूक करून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.





बीड : सुप्रसिद्ध दैनिक राज्य लोकतंत्रच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त संपादक गणेश मोकाशे व कार्यकारी संपादक सुभाष चौरे यांचा सत्कार केल्यानंतर सुभाष चौरे यांनी सा.दिव्य आधारचे संपादक शेख रिजवान यांचा परिचय करून दिल्यानंतर संपादक गणेश मोकाशे यांनी दिव्य आधार अंकाचे अवलोकन केले. त्यावेळी त्यांनी अंकातील वृत्ताचे भरभरून कौतूक करत पुढील वाटचालीसाठी शेख रिजवान यांच्या पाठीवर थाप दिली.

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी डॉ.ज्योतीताई मेटे यांची निवड करावी -प्रा.शेंडगे

**बीड । दिव्य रिपोर्टर**

राज्यातील महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या 'राज्य महिला आयोगाच्या' अध्यक्षपदासाठी डॉ.ज्योती विनायकराव मेटे यांची निवड करण्यात यावी,अशी मागणी शिवसंग्रामचे सोशल मीडिया प्रमुख प्रा.पंडित शेंडगे यांनी केली आहे.



प्रशासकीय अनुभवाची शिदोरी, राजकीय प्रगल्भता आणि सामाजिक प्रश्नांची असलेली जाण यांमुळे डॉ.ज्योतीताई या पदासाठी सर्वात 'योग्य' आणि 'सक्षम' उमेदवार असल्याचे मत राजकीय व सामाजिक वर्तुळातून व्यक्त होत आहे. प्रशासकीय अनुभव आणि पारदर्शक चारित्र्य , डॉ.ज्योतीताई मेटे यांच्याकडे प्रशासकीय सेवेचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यामुळे सरकारी कामकाजातील नियमांची अचूक जाण आणि कामाचा वेग ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. सार्वजनिक जीवनात वावरताना त्यांनी जपलेली चारित्र्याची शुद्धता आणि पारदर्शक कार्यपद्धती यामुळे त्यांच्या नावाचा विचार गांभीर्याने केला जावा असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे. स्व.विनायकराव मेटे साहेबांच्या निधनानंतर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगराखाली न दबून जाता, त्यांनी 'शिवसंग्राम' संघटनेची धुरा अत्यंत धैर्याने सांभाळली. एक 'संघर्षशील सखी' म्हणून त्यांनी स्वतःची ओळख निर्माण केली आहे.पीडित महिलांच्या हक्कासाठी लढण्याची जिद्द आणि त्यांच्या प्रती असलेली संवेदनशीलता ही डॉ. ज्योतीताईंच्या व्यक्तिमत्त्वाची खास वैशिष्ट्ये आहेत. राज्य महिला आयोगाला अशा नेतृत्वाची गरज आहे, ज्यांच्याकडे कायद्याची जाण आणि पीडितांबद्दल माणुसकी असेल.डॉ.ज्योतीताईंकडे या दोन्ही गोष्टींचा संगम पाहायला मिळतो. लोकसंग्रह आणि लोककल्याण या सूत्रावर आधारित त्यांची आजवरची वाटचाल राहिली आहे. प्रशासकीय अनुभव, राजकीय प्रगल्भता आणि सामाजिक संवेदना पाहता, डॉ.ज्योतीताई मेटे यांची निवड ही राज्यातील महिलांना न्याय देण्याच्या दृष्टीने अत्यंत 'न्याय्य' ठरेल, असा विश्वास शिवसंग्राम समर्थकांकडून व्यक्त होत आहे.

## पान १ वरून

### त्या गायरान जमीन प्रकरणी

तरफ पिंगळे येथील जमीन शहरहद्दीच्या बाहेर आहे असा खरेदीखतात उल्लेख केला. जर ही जमीन शहर हद्दीच्या बाहेर होती तर त्या जमिनीवर म्हाडाचे आरक्षण कसे पडले? तसेच एकीकडे आरक्षण काढण्यासाठी संबंधित मालकांनी राज्यपाल यांच्या शिफारशीने प्रस्ताव पाठविला आणि दुसरीकडे सदरील जमीन शहर हद्दीच्या बाहेर आहे असे दाखवून खरेदीखत केले. या सर्व बाबी संशयास्पद असून आता मनसेचे राज्य उपाध्यक्ष हे २०२४ यावर्षी झालेल्या रजिस्ट्री संदर्भात पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले असून लवकरच या प्रकरणी रजिस्ट्री कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

### ७३ कोटीच्या दंडात्मक कारवाई

होती. तसेच त्यासोबत बीड शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या विविध खदाण मालकावरही दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. परंतु सर्वाधिक दंड ७३ कोटी रुपये असल्याने सर्वांचे लक्ष या दंडात्मक कारवाईकडेच होते. बीड तहसीलदार यांनी याप्रकरणी पुढील कारवाईसाठी एसडीएम जाधव मॅडम यांच्याकडे हे प्रकरण सुपूर्द केल्यानंतर जाधव मॅडम यांनी पुन्हा तहसीलदार यांना पत्रव्यवहार करून सदरील खदाणीची ईटीएस मोजणी करून दंडात्मक कारवाई करावी असे आदेशित केले होते. या प्रकरणाकडे आता बीड तहसीलदार यांनी विशेष लक्ष घातले असून संबंधित मालकाच्या सातबारावर बोजा पूर्वीच चढलेला होता. आता पुन्हा पत्रव्यवहार करून संबंधित खदाण मालकाच्या प्रॉपर्टीची खरेदी-विक्रीही थांबविण्यात आली असून लवकरच याप्रकरणी ईटीएस मोजणी करून पुढील कारवाई करणार असल्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिव्य आधारला सांगितले.

### अनाधिकृत भागशाळा व

शिक्षणसंस्थेला पत्र देवून तुकडी वर्ग सुरू करण्याची परवानगी दिली होती परंतु संबंधित शिक्षणसंस्था यांनी त्या पत्राचा विपरित पर्यास काढून चक्क त्या पत्राच्या आधारावर अनाधिकृत भागशाळा सुरू केल्या. बीड शहरात भालदारपुरा, गांधीनगर व बालेपीर परिसरात या अनाधिकृत भागशाळा सुरू असल्याची बाब तत्कालीन शिक्षणाधिकारी यांना समजल्यानंतर त्यांनी २०१० साली या शाळांना भेटी देवून त्या शाळाची तपासणी केली असता या भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी दिला होता. तसेच या अनाधिकृत भागशाळा तात्काळ बंद करण्यात याव्यात नसता या शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांचा पगार बंद केला जाईल असेही त्या पत्रात नमूद आहे परंतु संबंधित उर्दू शिक्षणसंस्थेने शिक्षणाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आजही त्या अनाधिकृत भागशाळा सर्रास सुरू ठेवल्या. विशेष म्हणजे या अनाधिकृत भागशाळाच्या नावावर शिक्षकभरतीही केल्याची बाब समजली असून आता या प्रकरणी एसआयटीकडे तक्रार देवून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी एक समाजसेवक करणार असल्याचे समजले असून त्यांनी दिव्य आधारकडून सर्व पुरावे घेवून तक्रार करणार असल्याचे सांगितले आहे.

### तरफ पिंगळे येथील त्या अंध

समाजसेवक राहुल अंकुशे व इतरांनी तक्रार दिल्यानंतर मंडळाधिकारी, तलाठी यांनी संबंधित गायरान जमिनीचा पंचनामा करून अहवालही दिला असून आता बीड तहसीलदार संबंधितांवर काय कारवाई करतील याकडे विशेष लक्ष लागून आहे. तसेच या प्रकरणी तहसीलदार यांच्या दालनात दोन सुनावण्या झाल्या परंतु संबंधित भाडेकरू दोन्ही सुनावणीला गैरहजर असल्याने पुन्हा एक संधी म्हणून संबंधित भाडेकरूचे म्हणणे ऐकूण घेण्यासाठी देण्यात आली असून आता या शेवटच्या संधीत भाडेकरू आपले मत मांडणार असल्याचे तहसीलदार यांनी सांगितले. जर ही शेवटची संधी हुकली तर तालुका प्रशासन आपल्या स्तरावर गंभीर कारवाई करणार असल्याचेही शेळके यांनी दिव्य आधारला सांगितले.

### घरकुलांसह वैयक्तिक लाभाच्या

वितरण श्री मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

मागील काही महिन्यात राज्यातील अनेक मोठ्या नेत्यांनी मला ठरवून बदनाम केले, मात्र माझी परळीची जनता ठामपणे माझ्या पाठीशी उभी आहे, याचा मला अभिमान व आनंद वाटतो आणि तितकीच जबाबदारीची जाणीवही होते, असेही धनंजय मुंडे यांनी नमूद केले.याप्रसंगी नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, अजय मुंडे, दिव्यांग कल्याण महामंडळाचे उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, राजा खान, प्रा. पवन मुंडे, रवींद्र गित्ते, राजाभाऊ पोळ, माणिकभाऊ फड, श्रीकृष्ण कराड यांच्या सह विविध प्रभागातील नगरसेवक, नगर परिषद मुख्याधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## भारताचे एलपीजी संरक्षण कवच: जागतिक अडचणींमध्येही घरगुती पुरवठा अखंड

मार्च २०२६ मध्ये पश्चिम आशियातील भू-राजकीय तणावामुळे Strait of Hormuz मार्गावरील जहाज वाहतुकीवर परिणाम झाला आहे, जो भारताच्या जवळपास ९०% ड्झत्रः आयातीसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. जगातील दुसऱ्या क्रमांकाचा LPG आयातदार असलेल्या भारतात सुमारे ६०% गरज आयातीद्वारे पूर्ण होते, तर उर्वरित देशांतर्गत उत्पादनातून भागवली जाते. या पार्श्वभूमीवर संभाव्य तुटवड्याची चिंता निर्माण झाली असली तरी, भारत सरकारने त्वरित आणि ठोस उपाययोजना करून घरगुती गॅस पुरवठा सुरक्षित ठेवला आहे.

Essential Commodities Act अंतर्गत घेतलेल्या उपाययोजनांमुळे देशातील LPG पुरवठा साखळी पूर्णपणे सुरळीत सुरू आहे. कोणत्याही वितरकांकडे गॅस संपल्याच्या घटना आढळलेल्या नाहीत आणि वितरण वेळेत कोणताही बदल झालेला नाही. ३३ कोटींहून अधिक कुटुंबांना – ज्यात १०.४ कोटी प्रधानमंत्री उज्ज्वला योजना लाभार्थी समाविष्ट आहेत – अखंडित गॅस पुरवठा सुरू आहे.

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री श्री हरदीप सिंह पुरी यांनी संसदेत स्पष्ट केले की, घरगुती ड्झत्रःपुरवठा पूर्णपणे सुरक्षित आहे आणि बुकिंगपासून वितरणापर्यंतचा कालावधी पूर्वीप्रमाणेच २.५ दिवस आहे.

**देशांतर्गत उत्पादनात वाढ**

८ मार्च २०२६ रोजी पेट्रोलियम मंत्रालयाने LPG Control Order जारी करून सर्व रिफायनरी आणि पेट्रोकेमिकल प्रकल्पांना ड्झत्रः उत्पादन वाढवण्याचे निर्देश दिले. प्रोपेन, ब्यूटेन, प्रोपिलीन आणि ब्यूटीन यांसारख्या घटकांचा वापर आता थेट घरगुती LPG साठी करण्यात येत आहे. या निर्णयामुळे देशांतर्गत उत्पादनात २५-२८% वाढ झाली असून, काही अहवालांनुसार ती ३१% पर्यंत पोहोचली आहे. सर्व अतिरिक्त उत्पादन थेट घरगुती ग्राहकांना पुरवले जात आहे. Reliance Industries सारख्या खाजगी कंपन्यांनीही या प्रयत्नांना साथ दिली आहे.

**घरगुती वापराला प्राधान्य**

वाढीव उत्पादन पूर्णपणे घरगुती वापरासाठी राखीव ठेवण्यात आले आहे. रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांना प्राधान्याने पुरवठा सुरू आहे.

हॉटेल आणि रेस्टॉरंटसाठी नियंत्रित वितरण प्रणाली लागू करण्यात आली असून, त्यांच्या सरासरी मागणीपैकी २०% पुरवठा राज्य सरकारांच्या समन्वयाने दिला जात आहे, ज्यामुळे साठेबाजी आणि काळाबाजार रोखता येत आहे.

मागणी नियंत्रण उपाय

घाबरून जास्त प्रमाणात बुकिंग होऊ नये यासाठी सरकारने काही उपाययोजना केल्या आहेत. शहरी भागात २५ दिवस आणि ग्रामीण भागात ४५ दिवसांनंतरच पुढील सबसिडी सिलिंडर बुकिंग

Delivery -uthentication Code (D-C) प्रणाली ९०% पर्यंत विस्तार

डिजिटल बुकिंगला प्रोत्साहन (IVRS, SMS, Whats App)

**रविवारी वितरक केंद्रे सुरू ठेवणे**

यामुळे बुकिंगची संख्या १३ मार्च रोजी ८८.८ लाखांवरून आता ७७ लाखांपर्यंत कमी झाली आहे.

**पर्यायी इंधनांचा वापर**

१४ मार्च २०२६ रोजी करण्यात आलेल्या सुधारित आदेशानुसार PNG (Piped Natural Gas) असलेल्या घरांना LPG कनेक्शन सोडणे बंधनकारक केले आहे.

तसेच, खालील पर्यायी इंधनांचा वापर वाढवण्यात आला आहे:

४८,००० घड अतिरिक्त केरोसीन पुरवठा

हॉटेल क्षेत्रासाठी बायोमास, ठऊऋपेलेट्स, कोळसा यांना तात्पुरती परवानगी

औद्योगिक क्षेत्रासाठी फ्युएल ऑइल

यामुळे LPG वरचा ताण कमी झाला आहे.

आयात विविधीकरण आणि नियंत्रण

देशांतर्गत उत्पादन वाढले असले तरी आयातही सुरू आहे. ८०,००० टन ड्झत्रःघेऊन दोन जहाजे भारताकडे येत आहेत. अमेरिका, नॉर्वे, कॅनडा, अल्जेरिया आणि रशिया यांच्यासोबत नवीन करार प्रक्रियेत आहेत.

राज्य आणि जिल्हा पातळीवर नियंत्रण यंत्रणा सक्रिय आहे. २२ राज्यांमध्ये कंट्रोल रूम सुरू असून, अचानक तपासणी आणि साठेबाजीविरोधी कारवाई सुरू आहे.

नागरिकांसाठी संदेश

सरकारने नागरिकांना विनंती केली आहे की, अनावश्यक घाईत बुकिंग करू नये. दररोज ५० लाखांहून अधिक सिलिंडर पूर्वीप्रमाणे वितरित होत आहेत.

**निष्कर्ष** : भारत सरकारच्या उपाययोजनांमुळे LPG पुरवठा साखळी पूर्णपणे सुरक्षित आणि कार्यरत आहे. जागतिक अडचणी असूनही देशांतर्गत उत्पादन वाढले आहे, वितरण सुरळीत आहे आणि कोट्यवधी कुटुंबांना कोणताही अडथळा न येता गॅस मिळत आहे. ही परिस्थिती भारताच्या ऊर्जा सुरक्षेची मजबुती आणि सरकारची नागरिकांप्रती असलेली बांधिलकी दर्शवते.

## महाराष्ट्र राज्याच्या शैक्षणिक गुणवत्तेत व क्रीडा व कला क्षेत्रामध्ये प्रगती विद्यालयाची भरारी

**बीड । दिव्य रिपोर्टर**





जिल्ह्यामध्ये अनेक शिक्षण संस्था आहेत तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा पण आहेत शिक्षण क्षेत्रात काम करतात त्यापैकीच भायळा या छोट्याशा गावाचे सुपुत्र माननीय रामकृष्णजी बांगर साहेब तसेच संस्थेचे सचिव सौ सत्यभामाताई बांगर साहेबा यांनी महात्मा फुले सावित्रीबाई फुले शाहू महाराज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मा जिजाऊ यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शैक्षणिक संस्थेची स्थापना केली जिल्ह्यातील गोरगरीब होतकरू हुशार विद्यार्थ्यांसाठी शाळा स्थापन केली त्यापैकीच प्रगती शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बीड शहरातील प्रगती विद्यालय बालेपीर बीड येथील शाळेने अल्पवधीतच देश व राज्य पातळीवर विविध स्पर्धांमध्ये व शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच आपला धबधबा निर्माण केलेला आहे नुकत्याच जाहीर झालेल्या एन एम एम एस म्हणजेच आर्थिक दुर्बल घटक परीक्षा महाराष्ट्र शासनातर्फे शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते त्यामध्ये एकूण १५ विद्यार्थी पात्र झाले आहे २) मुंबई सायन्स रिर्चस असोसिएशन मार्फत राज्यस्तरीय डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा घेण्यात येते त्यामध्ये पण नेत्रदीपक यश प्रगती विद्यालयाने संपादन केला असून एकूण ११ विद्यार्थी सेकंड लेव्हल साठी पात्र झाले आहे तसेच ३) राज्यस्तरीय ज्युनिअर आयआयएस परीक्षेत विद्यालयाने यश संपादन करून राज्याच्या यादीत उच्चांक निर्माण केलेला आहे ४) त्याचप्रमाणे राज्यस्तरीय नॅशनल स्कॉलर सर्च परीक्षेत यश संपादन करून मेडल व ट्रॉफी प्राप्त केले आहे ५) राष्ट्रीय विज्ञान दिन विद्यालयांमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला आहे त्यामधील विद्यार्थ्यांनी विविध असे प्रयोग करून प्रत्यक्ष अध्यक्ष व अतिथींना व इतर पालकांना आपापल्या प्रयोगाची माहिती विद्यार्थी उत्स्फूर्तपणे देत आहेत ६) विद्यालयामध्ये दरवर्षी भूगोल दिन उत्साहात साजरा करण्यात येते त्यामध्ये पण विद्यार्थी आपापल्या नवीन कल्पनेतून नवे नवे प्रयोग करून आणतात त्यापैकी केंद्रीय ज्वालामुखीचा उद्रेक, सोलर पवन ऊर्जा, सूर्यग्रहण कसे होते हवेचे थर थर्माकोलच्या प्रतिकृतीतून दाखवून देतात ६) क्रीडा क्षेत्रात महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक संचालनालय पुणे द्वारा शालेय विविध क्रीडा स्पर्धा तसेच असोशियन मार्फत विविध क्रीडा स्पर्धा राज्यस्तरीय घेण्यात येतात त्यामध्ये तायक्वादो या खेळात राज्यस्तरीवर कुमारी मिसाळ सिद्धी कुमारी मिसाळ स्वरा कुमारी जायभाय सृष्टी यांनी यश संपादन केले आहे तसेच राज्यस्तरीय युनिफाईड मध्ये कुमारी बडे अनुष्का या खेळाडूने ब्रांच पदक प्राप्त केले आहे ७)विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न झाली आहे दिनांक २ जानेवारी २६ ते ७ जानेवारी २०२६ दरम्यान किंवा या कालावधीमध्ये प्रेक्षणीय स्थळे धार्मिक ऐतिहासिक व भौगोलिक स्थळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांनी आनंद लुटला आहे ८) नवोदय व पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा मध्ये सुद्धा आमच्या विद्यालयाचे विद्यार्थी यश संपादन करतात ९) त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवरच इतर राज्यस्तरीय परीक्षा गणित ओलंपियाड सायन्स ओलंपियाड इंग्रजी ओलंपियाड इतिहास ओलंपियाड मंथन एमटीएस या विविध स्पर्धा परीक्षेमध्ये प्रगती विद्यालयाच्या विद्यार्थी सहभाग घेऊन जिल्हा व राज्याच्या यादीमध्ये आपले नाव प्रथम द्वितीय क्रमांकाने राज्याच्या यादीमध्ये अभ्यासाच्या जोरावर आणतातआणि एस एस सी बोर्डाच्या परीक्षेमध्ये दरवर्षी शंभर टक्के निकालांची परंपरा विद्यालयाचे नाव उंचावतात या सर्व गुणवंत यशवंत विद्यार्थ्यांचा संस्थेचे संस्थापक माननीय रामकृष्ण जी बांगर साहेब सचिव बांगर ताई युवा नेता बाळासाहेब बांगर विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक आबासाहेब गोपाळघरे सर दिलीप कंठाळे सर शेख सर घोळवे सर वाघवाले सर कदम सर सानप सर जायभाये सर अग्रवाल मॅडम ढाकणे सर नागरगोजे सर कंठाळे सर चव्हाण सर मस्के सर व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या

# 'त्या' सफाई कामगार वारसदारांच्या नियुक्तीची एसआयटी चौकशी करणे गरजेचे

## लाड समितीच्या जीआरचा गैरवापर झाल्याचा संशय

## ज्या नोकरदार सफाई कामगारांनी अनफिट प्रमाणपत्र सादर केलेत ते प्रमाणपत्रही बनावट असल्याचा संशय



**लाड समितीचा आधार घेवून अनेक सफाई कामगारांनी नोकरी विक्री केल्याचे दिसून येत असून जर पारदर्शक चौकशी झाली तर बीड नगरपालिकेत सफाई कामगार भरतीत कोट्यवधीचा घोटाळा समोर येण्याची शक्यता**

**वारसदारांना नियुक्ती दिलेल्या संचिका नगरपालिकेतील अस्थापना विभागातून गायब झाल्याची चर्चा**

**जिल्हा शल्यचिकित्सक यांचे अनफिट प्रमाणपत्र न घेता बाँडवर सफाई कामगार पदावर नियुक्ती दिल्याचे चित्र**


दिव्य आधार

सोमवार, दि. २३ मार्च २०२६ (पान-३)


# मोठी आर्थिक उलाढाल करून अपात्र वारसदारांना नियुक्ती दिल्याची शंका



ग्राऊंड रिपोर्टर
दिव्य आधार
शेख रिजवान
9561840184


**सफाई कामगार पदावर ज्या वारस हक्कदारांना नियुक्ती देण्यात आली ते खरे वारसदार आहेत का? किंवा वारसदार दत्तक घेवून सफाई कामगार नोकऱ्यांची विक्री झाली का? याचाही पाठपुरावा करण्याची गरज**

**सन २००० साली बीडचे तत्कालीन आमदार व तत्कालीन नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्या पुढाकाराने २४० सफाई कामगारांची भरती करून त्यांना पर्मनंट नियुक्ती देण्यात आली होती, याच पर्मनंट सफाई कामगारांनी नंतर लाड समितीच्या अहवालानुसार वारसदारांना नोकरी बहाल केली**

बीड :

नगरपालिकेत २००० या साली २४० सफाई कामगारांची भरती करण्यात आली होती परंतु हे कर्मचारी कंत्राटी बेसवर कामावर होते. या कर्मचाऱ्यांना पर्मनंट नियुक्त्या द्याव्यात म्हणून अनेक संघटनांनी पाठपुरावाही केला होता. शेवटी त्या काळातील तत्कालीन आमदार व तत्कालीन नगरपालिका मुख्याधिकारी यांच्या प्रयत्नाने या २४० सफाई कामगारांना पर्मनंट करण्यात आले. या २४० सफाई कामगारांना हक्काची नोकरी मिळाली. या नोकरीतून अनेक गरजू कुटुंबीयांना न्याय मिळाला. परंतु यातील काही सफाई कामगार नोकरीवर येत नसल्याने किंवा त्यांना काही शारीरिक किंवा मानसिकदृष्ट्या त्रास असल्याने ते सतत नोकरीवर गैरहजर राहात असल्याचे निदर्शणास आल्यानंतर यातील काही कर्मचाऱ्यांनी आपल्या जागेवर आपल्या वारसदारांना नोकरी लावण्यासाठी लाड समितीचा आधार घेतला आणि लाड समितीच्या अहवालानुसार जर एखादा सफाई कामगार शारीरिकदृष्ट्या अनफिट असेल तर तो आपल्या वारसदारांना आपल्या जागेवर नोकरी लावू शकतो. या जीआरचा आधार घेवून अनेकांनी आपल्या वारसदारांना हक्काची नोकरी मिळवून दिली. नियमाने हे सर्व काही बरोबर असले तरी त्यानंतर मात्र लाड समितीच्या अहवालाचा गैरफायदा घेवून अनफिट नसलेल्या पालकांनीही आपल्या वारसदारांना नोकरी लावण्यासाठी लाड समितीचा आधार घेतला. जर पालक अनफिट नसेल तर सफाई कामगार पदावर वारसदारांना नियुक्ती देणे नियमबाह्य आहे परंतु काही नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या संगनमताने अनफिट प्रमाणपत्र नसलेल्या वारसदारांनाही नियुक्त्या दिल्याची शंका व्यक्त केली जात आहे. लाड समितीचा आधार घेवून ज्या सफाई कामगारांनी आपल्या वारसदारांना सफाई कामगार पदावर नियुक्त्या दिल्यात जर या नियुक्त्या नियमात असेल तर काही हरकत नाही परंतु या नियुक्त्या नियमबाह्य झाल्या असतील तर या प्रकरणाची एसआयटी चौकशी करणे गरजेचे असून जर या प्रकरणी पारदर्शक चौकशी झाली तर मोठी पोलखोल होण्याची शक्यता असून नवनिर्वाचित स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम यांनी या प्रकरणी पाठपुरावा सुरू केला असून अस्थापना विभागातून त्यांनी वारसहक्काच्या आधारे नोकरी मिळविलेल्या सर्व पालकांची व वारसदारांची यादी मागविली असून यातून स्वच्छता सभापती मोठा पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी दिव्य आधारला सांगितले. लाड समितीच्या अहवालाचा आधार घेवून सफाई कामगार वारसहक्काने दिलेल्या नियुक्त्या संशयास्पद असून काही पालकांनी चक्क या माध्यमातून नोकऱ्या विक्री केल्याची चर्चा जोरात सुरू आहे. विशेष म्हणजे या सर्व प्रकरणात नगरपालिकेतील काही कर्मचारी सामील असल्याची शंका व्यक्त केली जात असून जर याप्रकरणी एसआयटी नियुक्त झाली तर मोठी पोलखोल होण्याची शंका दर्शवली जात आहे.

बीड नगरपालिकेत सफाई कामगार पदावर असलेल्या काही कर्मचाऱ्यांनी लाड समितीच्या अहवालाचा आधार घेवून आपल्या वारसदारांना नोकऱ्या दिल्याची बाब समोर आल्यानंतर या प्रकरणी चौकशी केली असता मोठ्या प्रमाणात वारसदारांना सफाई कामगार पदावर नियुक्त्या दिल्याचे निदर्शणास आले. नियमाने जर नोकरदार पालक शारीरिकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अनफिट असेल तरच आपल्या वारसदारांना सफाई कामगार पदावर नियुक्ती देवू शकतो. नियमाने पदावर असलेल्या पालकाने स्वत:चे मेडिकल टेस्ट करून शासकीय रुग्णालयातून जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडील अनफिट प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तसेच अनफिट प्रमाणपत्रासोबत बाँडवर या सर्व ॲग्रीमेंट होतात. परंतु मिळालेल्या माहितीनुसार ज्या वारसदारांना सफाई कामगार पदावर नियुक्ती देण्यात आली त्या नोकरदार पालकांच शल्यचिकित्सक यांच्याकडील अनफिट प्रमाणपत्र सादर केले नसल्याची गंभीर बाब समोर आली असून फक्त बाँडच्या आधारावरच या वारसदारांना नियुक्ती देण्यात आल्याची चर्चा जोरात आहे. या अनुषंगाने या सर्व प्रकरणाचा पाठपुरावा करण्याची गरज असून परंतु नगरपालिकेतून याप्रकरणी माहिती मिळत नसल्याने अनेक अडचणी समोर येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार ज्या वारसदारांना सफाई कामगार पदावर त्यांच्या पालकांच्या जागेवर नियुक्ती देण्यात आली अशा वारसदारांच्या संचिकाही अस्थापना विभागात नसल्याचे बोलले जात असून नेमक्या या संचिका गेल्या कुठे? हे मात्र समजून येत नाही. मिळालेल्या माहितीनुसार या सर्व प्रकरणाचा मुख्य सुत्रधार कोण? याचा छडा लागला तर त्या संचिकाही मिळून येतील अशी प्रतिक्रिया नगरपालिका परिसरात ऐकावयास मिळाली. तसेच नवनिर्वाचित स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम यांनीही या सफाई कामगार संदर्भात पाठपुरावा सुरू केला असून त्यांनी अस्थापना विभागातून २४० कर्मचाऱ्यांची यादी व त्यांच्या वारसदारांना नियुक्ती दिलेली यादीही मागविली असून जर याप्रकरणी नगरप्रशासनाने माहिती देण्यास मदत केली तर दिव्य आधारही याप्रकरणी लवकरच मोठी पोलखोल करणार यात काही शंका नाही.

### बनावट अनफिट प्रमाणपत्र देणारे डॉक्टरही गोत्यात येण्याची शक्यता

लाड समितीच्या अहवालानुसार एखादे नोकरदार सफाई कामगार अनफिट असेल तर तो नोकरदार आपल्या वारसदाराला सफाई कामगार पदावर स्वेच्छेने बाँडवर ॲग्रीमेंट करून नियुक्ती देवू शकतो परंतु त्या नोकरदार सफाई कामगाराला जिल्हा रुग्णालयातून अनफिट प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. मिळालेल्या माहितीनुसार अनफिट प्रमाणपत्र सादर न करता फक्त बाँडच्या आधारावर काही वारसदार नोकरीवर लागले असल्याची चर्चा आहे. तर ज्यांनी अनफिट प्रमाणपत्र सादर करून बाँडच्या आधारावर नोकरी मिळविली ते अनफिट प्रमाणपत्रही संशयाच्या विळख्यात असून जिल्हा रुग्णालयातील काही कर्मचाऱ्यांना मॅनेज करून हे अनफिट प्रमाणपत्र घेतल्याची शंका असून ज्यांनी अनफिट प्रमाणपत्र सादर केलेत अशा नोकरदार पालकांची पुन्हा तपासणी होणे गरजेचे आहे. जर अनफिट प्रमाणपत्र घेतलेल्या नोकरदारांची फेरतपासणी झाली तर मोठी पोलखोल होणार, यात काही डॉक्टर गोत्यात येण्याची शक्यता दर्शवली जात आहे.

**लाड समितीच्या अहवालानुसार जर एखाद्या सफाई कर्मचाऱ्याला नोकरी नको असेल आणि तो कर्मचारी शारीरिकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अनफिट असेल तर तो कर्मचारी आपल्या वारसदाराला स्वत:ची नोकरी देवू शकतो परंतु या लाड समितीच्या अहवालाचा मोठा गैरफायदा झाल्याची शंका**

**स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम यांनी सफाई कामगारांची माहिती अस्थापना विभागातून मागविली असून या प्रकरणी लवकरच मागील चार वर्षाच्या लेखा परिक्षणाचा अहवालही सभापती मागवून घेणार असल्याचे त्यांनी सांगितले, जर याप्रकरणी पारदर्शक चौकशी झाली तर मोठी पोलखोल होणार यात काही शंका नाही**

### त्या पालकांच्या सेवानिवृत्तीला तब्बल २५ ते ३० वर्षे शिल्लक

सफाई कामगार पदावर नियुक्त असलेल्या काही नोकरदारांच्या सेवानिवृत्तीला २५ ते ३० वर्षे शिल्लक होती. दरम्यान अशा पालकांनीही आपल्या वारसदाराला नोकरी मिळावी म्हणून बाँडवर लेखी स्विकृती दिली असावी. परंतु नियमाने या नोकरदारांचे २५ ते ३० वर्षे सेवानिवृत्तीचे शिल्लक असताना हे नोकरदार अनफिट कसे झाले? हा महत्त्वाचा मुद्दा असून आपल्या वारसदारांना सफाई कामगार पदावर नियुक्ती देण्यापूर्वी या नोकरदारांनी शल्यचिकित्सक यांच्याकडील अनफिट प्रमाणपत्र जोडले का? याचाही तपास होणे गरजेचे असून ज्या नोकरदार पालकांनी अनफिट प्रमाणपत्र जोडले ते प्रमाणपत्र शल्यचिकित्सक यांच्याकडीलच आहेत की? इतर कोठून अनफिट प्रमाणपत्र घेवून नगरप्रशासनाची दिशाभूल केली? याचाही पाठपुरावा करण्याची गरज आहे. तसेच ज्या वारसदारांना नियुक्ती देण्यात आली त्या वारसदाराचा आणि नोकरदार पालकाचे नाते काय आहे? तसेच वारसदार दत्तक घेतलेला आहे तर त्या दत्तक घेतलेल्या वारसदाराचा आणि नोकरदार पालकाचा काही रक्ताचे नाते आहे का? याचाही तपास करणे गरजेचे असून मिळालेल्या माहितीनुसार काही दत्तक वारसदारांनी नोकरदार पालकांना आर्थिक मदत करून या नोकऱ्या प्राप्त केल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

### अस्थापना विभागातून संचिका गायब? नगरप्रशासन गप्प का?

लाड समितीचा आधार घेवून अनेक नोकरदार पालकांनी आपल्या वारसदारांना सफाई कामगार पदावर नियुक्ती देवून स्वत:ची नोकरी त्यांनी सोडून दिली आहे. ज्या वारसदारांना या नियुक्ती देण्यात आल्या अशा वारसदारांच्या नियुक्ती दिलेल्या संचिका तपासणी करणे गरजेचे आहे. परंतु या संचिका अस्थापना विभागातून गायब झाल्याची चर्चा असून नगरप्रशासन मात्र या संचिकाचा शोध घेवून नेमका हा काय प्रकार आहे याचा तपास का करत नाही? त्यामुळे नगरप्रशासनाच्याही कामकाजावर प्रश्नचिन्ह लागले आहे. मागील अनेक वर्षांपासून नगरपालिकेवर प्रशासकराज आहे. म्हणून प्रशासनाला जवाब विचारणारे कोणी नव्हते परंतु आता नगरपालिकेवर अध्यक्ष-उपाध्यक्ष याशिवाय सभापती यांच्या नियुक्त्या झालेल्या असून आता मात्र या बोगसगिरीला लगाम लागण्याची शक्यता असून या सफाई कामगाराच्या नियुक्त्याची लवकरच मोठी पोलखोल होणार अशी शंका व्यक्त केली जात आहे.

**बीड नगरपालिकेत काही पालक सफाई कामगारांनी स्वत: अनफिट नसताना वारस हक्काचा आधार घेवून चक्क नोकरी विक्री करण्याचा यातून धंदा केल्याची चर्चा जोरात असून यामागचा मुख्य सुत्रधार कोण? याचा शोध घेण्यासाठी या प्रकरणाची एसआयटी चौकशी करणे गरजेचे**

**सफाई कामगारांना मुलं-बाळं नसल्याने त्यांनी वारसदार दत्तक घेवून लाखो रुपयाची कमाई केल्याची शंका असून यात नगरपालिकेतील एक कर्मचारी सामील असल्याची जोरदार चर्चा आहे, त्या कर्मचाऱ्यानेही मोठा आर्थिक व्यवहार केल्याचे दिसून येते.**

### लेखापरीक्षण अहवाल मागवून घेणार - सभापती शेख निजाम

स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम यांनी या पदाचा पद्भार घेतल्यानंतर बीड शहरात चांगल्या प्रमाणात स्वच्छता दिसून येत आहे. तसेच नगरपालिकेत एकूण स्वच्छता कर्मचारी किती? हे कर्मचारी कर्तव्यावर दररोज येतात का? याकडेही शेख निजाम यांनी विशेष लक्ष दिले आहे. तसेच वारसहक्काच्या आधारावर सफाई कामगार पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचाही आढावा शेख निजाम यांनी घेण्यासाठी माहिती मागविली असून वारस हक्काच्या आधारावर नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांची यादी मिळाल्यानंतर शेख निजाम हे पुढील पाठपुरावा करणार आहेत. तसेच मागील चार वर्षाचे लेखापरीक्षण अहवालही शेख निजाम यांनी मागवून घेतले असून वारस हक्काच्या आधारावर नोकरी मिळविलेले खरे वारसदार असतील तर त्यांना कोणताही त्रास होणार नाही, जर यातून गेम झाला असेल तर अशांची मात्र गय केली जाणार नाही अशी प्रतिक्रिया स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम यांनी दिव्य आधारशी बोलताना व्यक्त केली.




ईद मुबारक

सपोर्ट मल्टिपर्पज सोसायटी

बीड ब्लड बँक

१ ला मजला, हरि ओम कॉम्प्लेक्स, द्वारकादास मंत्री बँक शेजारी, जालना रोड, बीड

beedbloodbank@gmail.com

रमजान ईदनिमित्त सर्व जनतेस हार्दिक शुभेच्छा

डॉ.मधुली भदाणे

८७८८१०५२१८/९४२२७५०७८३

अनिल बिराजदार

८०८७७९८०८२



# जिद्द, चिकाटी, संयम आणि समाजकारण हे सभापती शेख निजाम यांच्या राजकीय विजयाचे रहस्य!





सत्यमेव जयते
साप्ताहिक
दिव्य आधार

## निजामभाईसारखा मोठा भाऊ पाठराखा असेल तर दु:ख आणि संकट जवळही येवू शकत नाही-शेख अकबर

















## वयाच्या २२ व्या वर्षी पहिली विजयाची माळ शेख निजाम यांच्या गळ्यात, तरुण पिढीने बोध घेण्याची गरज













# बीड नगरपालिकेची सत्तापरिवर्तनात शेख निजाम यांचा मोलाचा वाटा, अनेक संकटावर मात करत गाठले शिखर

बीड । दिव्य रिपोर्टर

राजकारणातूनही स्वत:ची ओळख निर्माण करता येते. यात जिद्द, चिकाटी, संयम आणि समाजकारण हे ब्रीद घेवून राजकारण करण्याची गरज आहे तरच राजकीय विजय मिळविणे शक्य आहे. नवनिर्वाचित स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम यांच्याकडे पाहिल्यावर असेच काही म्हणावेसे वाटते. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे बंधू शेख अकबर यांनी दिव्य आधारला विशेष मुलाखत देवून आपल्या भावाच्या वाढदिवसानिमित्त भावनिक भावना व्यक्त केल्या.यावेळी शेख अकबर यांनी सांगितले की, शेख निजाम यांच्यासारखा मोठा भाऊ पाठराखा असला तर दु:ख अन् संकटे जवळही येवू शकत नाहीत अशी भावना त्यावेळी शेख अकबर यांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे शेख निजाम हे पहिल्यांदा म्हणजे वयाच्या २२ व्या वर्षी नगरसेवक या पदावर विराजमान झाले. विजयाची पहिली माळ वयाच्या २२ व्या वर्षी त्यांच्या गळ्यात पडली, यातून तरुण पिढीने बोध घेण्याचीही गरज असून यंदा बीड नगरपालिकेच्या सत्तापरिवर्तनातही शेख निजाम यांचा मोलाचा वाटा असल्याचे बीडकरांनी उघड्या डोळ्याने पाहिले आहे. विशेष म्हणजे अनेक संकटावर मात करून शेख निजाम यांनी शिखर गाठल्याचे यातून स्पष्ट होते.

बीडचे राजकारण म्हटलं की कोणत्यातरी राजकीय घराण्याने ठरवायचे मुस्लिम समाज असो व इतर समाज त्यांनी ते स्वीकारायचं पण याउलट स्वतःच्या कर्तुत्वावर आपल्या स्वतःसाठी संधीशोधक व संधी निर्माण करून कसे सिद्ध होईल त्याचे प्रयत्न प्रमाणिक करून आजपर्यंत स्वतःला सिद्ध करून दाखवले याचा आम्हाला मोठ्या भावाचा अभिमान आहे. बीडच्या लोकांना मुस्लिम नगराध्यक्ष बीडमधून शंभर टक्के होतो, निवडणूक लढवून मोठ्या बलाढ्य शक्ती पासून दारुण पराभव झाला व ९ नगरसेवक निवडून आले. त्यानंतर तुम्ही सिद्ध झाला व राजकीय लोकांनी त्रास देणे सुरुवात केली, मोठ्या भावाला बऱ्याच संकटांना तोंड देताना पाहिले, कधीही न घाबरता येणाऱ्या संकटावर मात करणारा माझा मोठा भाऊ शेख निजाम आज सर्व राजकीय शत्रूंनी सत्तेच्या जोरावर मिळून कट रचून खोटा गुन्हा दाखल केलेला आहे. पण मला अभिमानाने सांगावेसे वाटते संकट कितीही मोठे असो त्यावर तो सहज मात करेल व सर्व राजकीय शत्रूंना त्याचे कर्तृत्व सिद्ध करून दाखवेल. मला मोठ्या अभिमानाने सांगावेसे वाटते बीडच्या राजकारणात मुस्लिम समाजाचे बरेच नेते पाहिले पण माझ्या मोठ्या भावासारखे अस्तित्व कोणाला निर्माण करता आले नाही. राजकीय क्षेत्र असो, शैक्षणिक क्षेत्र असो किंवा सामाजिक क्षेत्र असो त्याची गरुडझेप कोणीही रोखू शकले नाही. वेळ कठीण आहे पण त्यावर शंभर टक्के मात देणार आणि स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करून दाखवणारच.

राजकारण कशाला म्हणतात, राजकारणात भल्या मोठ्या मोठ्या पुढाऱ्याला न समजणारी व्यक्ती महत्व संधीचं सोनं करणार व्यक्तिमत्व स्वकर्तुत्वावर आपली वेगळी ओळख निर्माण करणारा, वेळ कितीही कठीण असो न घाबरता, न चुकता योग्य निर्णय घेणारा, चुकलेल्या निर्णयाला योग्य वेळी खरं ठरवणारा, कोणताही राजकीय वारसदार नसताना राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात आपल्या केलेल्या कार्याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.







## राजकीय, सामाजिक व शैक्षणिक औद्योगीक पार्श्वभूमी

स्वच्छता व आरोग्य सभापती शेख निजाम हे राजकारणापुरतेच सिमित नसून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक व औद्योगीक क्षेत्रातही मोठी भरारी घेतली आहे. आज शहरात जयहिंद उर्दू प्राथमिक विद्यालय, जयहिंद उर्दूमाध्यमिक विद्यालय, जयहिंद उच्च माध्यमिक महाविद्यालय, जयहिंद डी एड कॉलेज, इकरा उर्दू प्राथमिक विद्यालय, जयहिंद इंग्लिश स्कूल, जयहिंद व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षन केंद्र, दारूसलाम अर्बन निधी (बँक) यासह औद्योगीक क्षेत्रातही जयहिंद सॉ मिल बीड, इंडियन सॉ मिल बीड, जयहिंद उडण औरंगाबाद, जयहिंद पेट्रोलियम बीड, जयहिंद डेवलपर्स, मराठवाडा बिल्डर्स, जयहिंद स्टोन क्रेशर, छत्रपती कॅपिटल शिवाजीनगर, अकबर कॅपिटल बशीरगंज, जय हिंद लॉन्स गेवराई तांडा, जय हिंद कॉर्नर कॉम्प्लेक्स गेवराई तांडा अशाप्रकारे आज शेख निजाम व ब्रदर्स यांचा राजकीय, सामाजिक व शैक्षणिक, औद्योगीक क्षेत्रात मोठा बोलबाला असून कोणतेही राजकीय पाठबळ नसताना स्वर्कृत्वावर केलेले हे कार्य खरोखरच उल्लेखनीय आहे.

## शेख निजाम यांचा राजकीय प्रवास लक्ष केंद्रीत करणारा

राजकीय कोणतेही पाठबळ नसताना शेख निजाम यांनी राजकारणात आपली ओळख समाजकारणातून निर्माण केली आहे. जिद्द, चिकाटी व संयम हे ब्रीद घेवून त्यांनी आपले राजकारण केले असून गोरगरीब, गरजूंच्या सेवेतून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. वयाच्या २२ व्या वर्षी नगरसेवक म्हणून निवडूण आले. तसेच बीड राष्ट्रीय कॉंग्रेस सचिव होते., बीड नगर परिषद सभापती या पदावर त्यांची उल्लेखनिय कामगिरी आजही बीडकरांच्या लक्षात आहे. त्यानंतर त्यांचे लहान भाऊ शेख अमर यांनाही नगरसेवक पदावर निवडूण आणण्यासाठी शेख निजाम यांनी मोठे प्रयत्न केले व ते निवडूणही आले. त्यानंतर पत्नीलाही नगरसेवक पदावर निवडूण आणण्यासाठी मोठे परिश्रम घेतले व त्यातही यश मिळाले. विशेष म्हणजे २०१६ यावर्षी जनतेतून नगराध्यक्ष निवडणुक होती त्यावेळी निसटता पराभव झाला. एकूण १८००० मत घेऊन शेख निजाम यांनी विरोधकांचा थरकाप उडविला होता, परंतु शेवटी फक्त १६०० मतांनी पराभव स्वीकारावा लागला. अशाप्रकारे शेख निजाम यांचा पारदर्शक राजकीय प्रवास असून पुन्हा त्यांना बीडच्या नागरिकांनी स्वीकारले आणि आज ते पुन्हा स्वच्छता व आरोग्य सभापती पदावर विराजमान आहेत. नंतर एमआयएम पक्षाचे ते जिल्हाअध्यक्ष होण्याचा मानही त्यांना मिळाला होता.

## बीडची राजकीय सत्ता परिवर्तन करण्यासाठी शेख निजाम यांचा मोलाचा वाटा

शेख निजाम यांनी २०२५ मध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजितदादा गटात) प्रवेश केला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अल्पसंख्याक विभाग जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांना नियुक्ती देण्यात आली. त्यानंतर बीड नगरपालिका निवडणूकीचे बिगुल वाजले, नगराध्यक्ष पद पुन्हा जनतेतून निवडणणार आणि नगराध्यक्षपदासाठी एससी उमेदवार असल्याने शेख निजाम यांनी यासाठी विशेष चक्रव्यूह आखले आणि शेख मुजीब यांच्या सासूबाई प्रेमलता पारवेताई यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्यासाठी शेख निजाम यांनी विशेष प्रयत्न केले. आ.अमरसिंह पंडित व आ.विजयसिंह पंडित यांचे विश्वसनीय म्हणून शेख निजाम यांची मोठी ओळख आहे. यातूनच बीडच्या राजकारणात फेरबदल सुरू झाले. शेवटी बीडची राजकीय सत्ता उलथून टाकण्यासाठी शेख निजाम हे किंगमेकर ठरले. शेख निजाम यांची नगरपालिकेवर नगरसेवक म्हणून निवड तर झालीच त्यांनी दिलेला उमेदवार म्हणून प्रेमलताताई पारवे याही नगराध्यक्ष पदावर विराजमान झालय. आपल्याला व आपले नेतृत्व शिवछत्र परिवार यांना आपल्या वाढदिवसानिमित्त एकच विनंती बीडकरांनी मोठ्या अपेक्षेने नगरपरिषद आपल्या ताब्यात दिलेली आहे, शहरात असे काम करा लोकांनी म्हटले पाहिजे १००% प्रामाणिक काम करत आहेत. लोकांच्या संधीचं सोनं करा, लोकांना पश्चाताप होईल असे काहीही काम करू नका एवढी सदिच्छा आपणास वाढदिवसाच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा



मोठ्या भावाला वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.